# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 26 June 2025
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक २६ जून २०२५ दुपारी १.०० वा.

****

राजर्षी शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त त्यांना आज राज्यभरात अभिवादन करण्यात येत आहे. कोल्हापूर इथं त्यांच्या जन्मस्थळी विविध मान्यवरांकडून त्यांना अभिवादन करण्यात आलं. लोककल्याणकारी राजा, समाजसुधारक आणि समतेचे पुरस्कर्ते म्हणून शाहू महाराजांचं कार्य हे नेहमीच प्रेरणादायी राहिलं आहे. सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, खासदार शाहू महाराज छत्रपती यांच्यासह मान्यावरांची यावेळी उपस्थिती होती.

****

गेल्या ११ वर्षांत सेवा आणि सुशासनाच्या माध्यमातून अनुभवलेली प्रगती यापूर्वी कधी झाली नव्हती, असं प्रतिपादन केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांनी केलं. सरकारच्या ११ वर्षाच्या कार्यकाळानिमित्त नवी दिल्ली इथं आयोजित पत्रकारपरिषदेत ते आज बोलत होते. विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचं सक्षमीकरण करण्यात येत असल्याचं पाटील म्हणाले.

****

दहशतवाद प्रादेशिक शांतता आणि विश्वासासाठी सर्वात मोठा धोका असून, त्याविरुद्ध एकत्रित कृती करण्याचं आवाहन, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं आहे. चीनमधील किंगदाओ इथं शांघाय सहकार्य संघटनेच्या संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत ते बोलत होते. दहशतवाद आणि समृद्धी एकत्र राहू शकत नाही, असं सिंह यांनी स्पष्ट केलं. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख करत, या हल्ल्यात नेपाळच्या एका नागरिकासह २६ जणांचा मृत्यू झाला, याचा पुन:उच्चार सिंह यांनी केला. दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या देशांविरोधात शांघाय सहकार्य संघटनेनं

कठोर भूमिका घ्यावी, आणि अशा देशांना जबाबदार धरण्यात यावं, असं आवाहन राजनाथ सिंह यांनी केलं.

****

भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचणारे पहिले भारतीय अंतराळवीर ठरतील. ग्रुप कॅप्टन शुक्ला तीन सहकाऱ्यांसह आज दुपारी ४.३० वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर उतरणार आहेत. आपली अंतराळातील कामगिरी ही देशाच्या आगामी मोहिमांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची असल्याचं शुक्ला यांनी आज पाठवलेल्या संदेशात म्हटलं आहे.

**बाईट – शुभांशू शुक्ला, अंतराळवीर**

****

छत्तीसगढमध्ये सुरक्षा दलासोबत झालेल्या चकमकीत दोन महिला नक्षलवादी ठार झाल्या आहेत. नारायणपूर जिल्ह्यातील अबूझमाडच्या जंगलात काल सायंकाळपासून ही चकमक सुरु होती. परिसरात सुरक्षा दलांकडून शोधमोहीम सुरु आहे.

****

अमरनाथ यात्रेला यंदा ३ जुलैपासून सुरूवात होणार आहे. यात्रेकरुंच्या सुरक्षेसाठी व्यापक आणि बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली आहे. पंजाब पोलिसांनी यासाठी व्यापक सुरक्षा आराखडा तयार केला असून तो अंमलात आणण्यात येणार आहे. यात्रेच्या मार्गांवर २४ तास निरीक्षण करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. अनेक ठिकाणी नियंत्रण केंद्र स्थापन करण्यात आले असून, याच्या माध्यमातून यात्रा मार्गांवरून प्रवास करणाऱ्या वाहनांवर आणि यात्रेकरुंवर २४ तास लक्ष ठेवले जाणार आहे. ही यात्रा ९ ऑगस्ट पर्यंत चालणार आहे.

****

सरन्यायाधीश भूषण गवई यांचा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ वकील संघातर्फे आज छत्रपती संभाजीनगर इथं सत्कार करण्यात येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत हे अध्यक्षस्थानी असतील तर सर्वोच्च न्यायालयचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता न्यायमूर्ती ए.एस.चांदूरकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहील अशी माहिती, संघाचे अध्यक्ष विधीज्ञ अविनाश बोरुलकर यांनी दिली. शहरातील एमजीएम विद्यापीठातील रुक्मिणी हॉलमध्ये सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

****

नांदेड जिल्ह्यात २० दिवसाच्या खंडानंतर पावसाचं पुनरागमन झालं आहे. जिल्ह्यात बुधवारी सायंकाळपासून पावसाची संततधार सुरु होती. या पावसामुळे रखडलेल्या खरिपाच्या पेरण्यांना आता गती येणार असून, पेरणी झालेल्या पिकांनाही जीवनदान मिळालं आहे. जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी ६० पूर्णांक ३० मिलिमीटर पावसाची नोंद झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.
छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गेल्या २४ तासात १०८ पूर्णांक ४ मिलिमीटर तर विभागात ११६ पूर्णांक १ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

****

महिला हॉकी इंडिया मास्टर्स करंडक स्पर्धेची अंतिम लढत उद्या ओडिशा आणि पंजाब यांच्यात होणार आहे. आज चेन्नईत इथं झालेल्या उपांत्य सामन्यांत पंजाबने हरयाणाचा ३-२ असा पराभव केला, तर ओडिशाने यजमान तामिळनाडूचा ४-१ ने पराभव करत अंतिम फेरी गाठली. दरम्यान, पुरुषांच्या अंतिम फेरीत यजमान तामिळनाडू आणि महाराष्ट्र यांच्यात उद्या अंतिम सामना होणार आहे.

****